ePaper
॥ वर्ष - 7 । अंक - 331 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com ॥ रविवार, दिनांक 21 एप्रिल 2024 ॥ पिंपरी-चिंचवड आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews

# शिवसेनेकडून औरंगाबादमधून संदीपान भुमरे यांना उमेदवारी



## आतील पानांत

- हैदराबादचा पुन्हा धावांचा महापूर
- राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केली
- टेस्लाची भारतातील गुंतवणूक लांबली
- माझ्यावर वेगवेगळे आरोप केले जातात

## पुणे- पिंपरी-चिंचवडकरांना उष्णतेपासून दिलासा

# विजांचा कडकडाट अन् ढगांचा गडगडाट!

### मुसळधार अवकाळी पावसाची हजेरी : उकाड्याने हैराण नागरिकांना काहीसा 'गारवा'

। पुणे । महाईन्यूज

**दिवसभर उकाडा आणि संध्याकाळी पाऊस असा प्रकार मागील काही दिवसांपासून पाहायला मिळतोय. त्यानुसार आजही पुणे शहरातील वेगवेगळ्या भागात पावसाने हजेरी लावली आहे. जांभूळवाडी -कोळेवाडी, आंबेगाव बुद्रुक - खुर्द परिसरात पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या आहेत. बाणेर-पाषाण, विद्यापीठ चौक परिसरात देखील पावसाला सुरुवात झाली आहे.**



आज तीन तासांमध्ये विजांच्या गडगडाटासह वादळी वाऱ्यांसह काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली होती. सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा या ठिकाणी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. त्यानुसार पुण्यात पावसाला सुरुवात झाली आहे.

मराठवाडा आणि परिसरावर समुद्रसपाटीपासून चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. त्यापासून कर्नाटक, दक्षिण तमिळनाडूपर्यंत वाऱ्यांचे प्रवाह खंडित झाल्याने कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला आहे. यामुळे राज्यात पावसाला पोषक हवामान झाले आहे. सतर्कने दिलेल्या माहितीनुसार पुणे आणि लातूर जिल्ह्यांत अनेत ठिकाणी मुसळधार पाऊस पुढील २ तास कायम राहण्याची शक्यता आहे. पावसाची शक्यता असणाऱ्या इतर जिल्ह्यांमध्ये अहमदनगर, बीड, परभणी, हिंगोलीचा समावेश आहे.

### वाहतूक कोंडीमुळे वाहनांच्या रांगा

**मुंबई बंगळूर महामार्गावर सुस खिंड येथे पावसापासून बचाव करण्यासाठी रस्त्यावर अशा प्रकारे दुचाकी उभ्या केल्याने सुस खिंड ते बाणेर येथील सदानंद हॉटेलपर्यंत वाहतूक कोंडीमुळे वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.**

## वाकड येथील फिनिक्स मॉल ऑफ मिलेनियममध्ये आग?

### आगीच्या चर्चेने वाकडमध्ये मोठी गर्दी अग्निशमन विभागाचे मॉकड्रील

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाकड येथील फिनिक्स मॉल ऑफ मिलेनियममध्ये सकाळी दहाच्या सुमारास मोठी आग लागल्याची वर्दी रहाटणी उपअग्निशमन केंद्राला मिळते. मॉलमध्ये अचानक सायरन वाजवत अग्निशमनचे बंब दाखल होतात. जवानांची धावपळ सुरू होते.त्यामुळे बघ्यांचीही गर्दी वाढते. वातावरण गंभीर बनलेले असतानाच हे केवळ मॉकड्रिल असल्याचे समजताच नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून वाकड येथील फिनिक्स मॉल ऑफ मिलेनियम येथे गुरुवारी (ता. १८) मॉकड्रिल घेण्यात आले. अग्निशमन विभागाकडून दरवर्षी एप्रिलमध्ये राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताह आयोजित करण्यात येतो. महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विविध शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, रहिवासी इमारती, मॉल आदी ठिकाणी आपत्कालीन व आगीच्या प्रसंगाची पूर्वतयारी म्हणून मॉकड्रिल आयोजित केले जातात.

घटनास्थळी प्रत्यक्ष कार्यवाही करतेवेळी अग्निशमन जवानांनी धुरामुळे बेशुद्ध झालेल्या व्यक्तीला त्वरित बाहेर काढत रुग्णवाहिकेतून नजीकच्या रुग्णालयात रवाना केले. तसेच, आगीवर पाण्याचा मारा करून नियंत्रण मिळवले. सब ऑफिसर विजय घुगे, अनिल वाघ, विकास तोडरमल, संभाजी दराडे, सुबोध शर्मा यांनी मॉकड्रिलमध्ये सहभाग घेतला.

### ग्राहक, दुकानदारांसाठी प्रात्यक्षिके

मॉलमधील ग्राहक, दुकानदार, सुरक्षारक्षक, स्टोअर कीपर यांना आग लागल्यास काय केले पाहिजे, याची माहिती मॉकड्रिल घेऊन देण्यात आली. अग्निशमन उपकरणांची हाताळणी, प्रात्यक्षिके ग्राहकांकडून व मॉलमधील कर्मचाऱ्यांकडून करून घेण्यात आली.

# भाजपच्या विजयासाठी मतदारचं उत्सुक!

## जिंकण्यासाठी काँग्रेसचे षडयंत्र, घाटेंचा काँग्रेसवर हल्लाबोल

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**भारतीय जनता पक्ष हा दोन खासदारांपासून, ३०० पेक्षा जास्त खासदार निवडून आणणारा पक्ष आहे. हे साध्य करण्यासाठी भाजपने कधीही कोणतेही षडयंत्र केले नाही केवळ कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर आणि मतदारांचा विश्वास मिळवत हे साध्य करून दाखवले आहे, हा इतिहास फार जुना नाही. देशातील मतदारच भाजपला तिसऱ्यांदा विजयी करत नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदी पाहण्यासाठी उत्सुक आहे.**



सर्वच गोष्टी जर भाजपच्या बाजूने असतील, तर विजयासाठी पुण्यात भाजपला षडयंत्र करण्याची गरज नाही हे सामान्य मतदाराही समजते. उलट काहीही करा पण निवडणूक जिंकून सत्ता काबीज करा, हे अलिखित आणि अघोषित धोरण गेली ६०-७० वर्षे देशात राबवणाऱ्या काँग्रेसचे चरित्र षडयंत्र रचण्याचेच आहे, असा घणाघात भारतीय जनता पार्टीचे पुण्याचे अध्यक्ष धीरज घाटे यांनी केला आहे. एमआयएम पक्षाची पुण्यात अनिस सुंडके यांना उमेदवारी मिळणे हे पराभवाच्या भीतीपोटी भाजपाचे पडद्यामागील षडयंत्र असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ॲड. अभय छाजेड यांनी पत्रकाद्वारे केला आहे.

त्या आरोपांचा समाचार शहराध्यक्ष घाटे यांनी सुस्पष्ट शब्दात घेतला. ते म्हणाले, 'गेली दहा वर्षे काँग्रेस सत्तेच्या बाहेर असल्याने त्यांना येनकेन प्रकारे त्यांना सत्ता हवी असल्याने त्यासाठी ते षडयंत्र रचण्याची शक्यता नाकारती येत नाही. पुण्यातील मतदारांनी सन २०१४ आणि २०१९ साली मोदीजींसाठी कसे मतदान केले याचा इतिहास ताजा आहे. यावेळीही मतदारांनी त्यांचे मन बनवले असून आता पुण्यातील नाही तर देशातील मतदार मोदीजींना पुन्हा तिस-यांदा पंतप्रधान करण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसत आहे. घाटे यांनी सांगितले की, 'अन्य पक्षातून काँग्रेसमध्ये केवळ तिकीटासाठी आलेल्या रविंद्र धंगेकरांना काँग्रेसने काही महिन्यापूर्वी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत उमेदवारी दिली. आता पुन्हा त्यांनाच लोकसभेसाठी उमेदवारी दिली असल्याने धंगेकरांना उमेदवारीवरुन कार्यकर्त्यांच्यातील मोठा वर्ग नाराज आहे. ही नाराजी व्यक्त करण्याचा एक भाग म्हणून भाजपसारख्या पक्षावर षडयंत्राचे आरोप केले जात आहेत. राहता राहिला एमआयएम ही भाजपची बी टीम असल्याचा दावा, तो दावा किती पोकळ आहे, हे वारंवार सिद्ध झाले आहे. निवडणूक आयोगाने हैद्राबादमधील ५ लाख ४० हजार बोगस मतदारांची नावे काढून टाकली आहेत. तसेच हैद्राबादमध्ये मोठ्या संख्येने बोगसमतदार असल्याचा आरोपच तेथील भाजपच्या उमेदवार माधवी लता यांनी जाहीरपणे केला होता. जर एमआयएम ही भाजपची बी टीम असती तर भाजपचे त्यांचे नुकसान ऐन निवडणुकीत केले असते का'

> ज्या काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात शपथेवर श्रीराम काल्पनिक असल्याचे सांगितले होते, त्याच काँग्रेसच्या सर्व नेत्यांवर रामनवमीच्या शुभेच्छा देऊन पत्रकार परिषद सुरू करण्याची वेळ का आली ? आमची सत्ता राज्यात १९९५ साली आली पण नंतर पंधरा वर्षे नाही आली. जेव्हा काँग्रेसच्या कारभाराला लोक कंटाळले आणि त्यांनी २०१४ साली भाजपला सत्तेवर बसवले. जे राज्यात तेच केंद्रात, स्व. अटलजींचे सरकार २००४ साली गेल्यानंतर काँग्रेसची सत्ता देशात आली, पण अवघ्या दहाच वर्षात देशातील जनतेने बहुमताने भाजपला केंद्रात सत्ता दिली. त्यासाठी कोणतेही षडयंत्र करावे लागले नाही, कारण ते भाजपचे चरित्रच नाही,
> **-धीरज घाटे,** अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पुणे

## काँग्रेस पक्षाने दलित समाजासाठी काय केले?

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



देशभरात आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्षाकडून उमेदवार जाहीर करण्यात आले असून पुणे लोकसभा निवडणुकीत चौरंगी लढत पाहण्यास मिळणार आहे. त्यामध्ये भाजपने माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना संधी दिली आहे. तर महाविकास आघाडीकडून आमदार रवींद्र धंगेकर, वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे, एमआयएमकडून माजी नगरसेवक अनिस सुंडके यांना उमेदवारी मिळाली आहे.

देशभरात कधी ही निवडणुका आल्या की, मुस्लिम, दलित या समाजातील व्यक्तिने काँग्रेस पक्षातील नेत्याकडे निवडणुक लढविण्याची इच्छा बोलवून दाखविली. तर त्याला संधी द्यायची नाही आणि त्या व्यक्तीला इतर पक्षाने निवडणुक लढविण्याची संधी दिल्यास, लगेच भाजपची टीम म्हणायचं, त्यामुळे काँग्रेस पक्षाकडे प्रत्येक निवडणुकीवेळी 'बी' टीम म्हणायचा हाच एकमेव मुद्दा असतो.त्या आरोपांना प्रत्युत्तर देताना एमआयएमचे पुणे लोकसभेचे उमेदवार अनिस सुंडके म्हणाले की, देशभरात कधी ही निवडणुका आल्या की, मुस्लिम, दलित या समाजातील व्यक्तिने काँग्रेस पक्षातील नेत्याकडे निवडणुक लढविण्याची इच्छा बोलवून दाखविली. तर त्याला संधी द्यायची नाही आणि त्या व्यक्तीला इतर पक्षाने निवडणुक लढविण्याची संधी दिल्यास, लगेच भाजपची टीम म्हणायचं, त्यामुळे काँग्रेस पक्षाकडे प्रत्येक निवडणुकीवेळी 'बी' टीम म्हणायचा हाच एकमेव मुद्दा असतो.

## प्रचारात मुळ मुद्दे भरकटवले जातायेत

### मोदी विरुद्ध सर्वसामान्य जनता : डॉ. कोल्हे

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**२०२४ च्या निवडणूक प्रचारात मुळ मुद्दे भरकटवले जाताय. वगद्वारी विरुद्ध एकनिष्ठा या विरोधातली लढाई सोबतचझ मोदी विरुद्ध सर्वसामान्य जनता अशी ही निवडणूक असल्याचं प्रतिपादन खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केलं.**



महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे आज भोसरी मतदार संघातील रुपीनगर, तळवडे, त्रिवेणीनगर, कृष्णानगर या भागातील दौऱ्यावर होते. यावेळी त्यांच्यासोबत धनंजय आल्हाट, सुलभा उबाळे, आशाताई भालेकर, दादा नरळे, नितीन बोडे, इम्रान शेख, अशोक पवार आदी सहभागी होते. नागरिकांशी संवाद साधताना डॉ. कोल्हे म्हणाले किझ संविधान वाचविण्यासाठीची ही मोठी लढाई या लोकसभेच्या माध्यमातून आपण लढत आहोत.

### महागाई कमी होणार आहे का ?

» मी, माझं, माझ्यासाठी याच्या पलीकडे जाऊन देश आणि देशातील जनता यांच्या प्रति माझी बांधिलकी आहे. त्यामुळे ही निवडणूक कोणाची पहिली असली काय किंवा शेवटची असली काय त्याने महागाई कमी होणार आहे का ? असा सवाल ही डॉ. कोल्हे यांनी केला.

पण मूळ मुद्यापासून निवडणूक भरकटवली जात आहे.

# मी लोकांची कामे करेन, हीच माझी गॅरंटी!

## आम्ही फक्त 'राउंड'वरचे नाही तर 'ग्राउंड'वरचे कार्यकर्ते : आढळराव पाटलांचा कोल्हेंना टोला

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"मी १५ वर्षात केलेल्या कामाचा हिशोब जनतेसमोर मांडला आहे, जनतेची कामे केली म्हणूनच बहुमतांनी जनतेने मला एकदा दोनदा नव्हे तर तीनदा खासदार म्हणून निवडून दिलं, यापुढेही जनतेसाठी सदैव उपलब्ध राहीन व लोकांची कामे करिन हि माझी गॅरंटी आहे" असे प्रतिपादन शिवाजी आढळराव पाटील यांनी मोशी येथे केले. शिरूर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे उमेदवार शिवाजी आढळराव पाटील यांनी आज मोशी, चिखली, जाधववाडी परिसरात आपला प्रचार दौरा केला. यावेळी जाधववाडी येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.**



अहमदनगर महामार्ग, नाशिक महामार्ग, तसेच सोलापूर महामार्गावरील वाहतूककोंडीच्या प्रश्नासाठी मी खासदार नसतानाही गेल्या पाच वर्षात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे अनेकदा पाठपुरावा केला त्यांनी त्याबाबत योग्य नियोजनही केले असून वाहतूक कोंडीचा प्रश्न नक्की सुटेल ही प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठीच मी निवडणुकीला सामोरे जातोय. सदैव जनतेसाठी उपलब्ध राहून जनतेची कामे करण्याची माझी गॅरंटी आहे. असेही आढळराव पाटील म्हणाले.

भोसरीचे भाजप आमदार महेश लांडगे तुमच्या प्रचारात दिसत नाहीत या पत्रकारांच्या प्रश्नावर आढळराव पाटील यांनी सांगितले कि, आमदार महेश लांडगे दररोज माझ्या संपर्कात आहेत, त्यांचा प्रचार, बैठका दिवसरात्र सुरु असून त्यांचे सर्व सहकारी सक्रियपणे प्रचारात सहभागी होत आहेत असे आढळराव पाटील म्हणाले. सध्या उन्हाळा वाढला असला तरीही जनतेसाठी ऊन, वारा, पावसाची आम्ही कधी तमा बाळगली नाही, नेहमी लोकांसाठी धावून गेलो. हि माझी शेवटची निवडणूक आहे या आवाहनामुळे कोल्हेंना वाईट वाटले असेल किंवा ते भावून झाले असतील तर मी पुन्हा निवडणूक लढवीन.. मुळात कोल्हे यांच्यात 'मी' पणा दिसतोय, निवडणूक त्यांच्या हातातून निसटल्याची हि लक्षणे आहेत असा टोला आढळराव पाटील यांनी अमोल कोल्हे यांना लगावला

प्रचारादरम्यान, शिवसेना उपनेते इरफान सय्यद, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, ट्रस्टचे मा. नगरसेवक वसंत बोराटे, शहर उपाध्यक्ष भोसरी विधानसभा अतीश बारणे, गाडा मालक अध्यक्ष गणेश सस्ते, पुणे जिल्हा परिषद मा. उपाध्यक्ष अरुण गिरे, ट्रस्टचे अध्यक्ष नितीन सस्ते पाटील, राष्ट्रवादी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष कविता अल्हाट, भोसरी विधानसभा अध्यक्ष उत्तम अल्हाट, भैरवनाथ पतसंस्थेचे संचालक अभिमन्यू लांडगे, मा. शिक्षण मंडळाचे सदस्य विजू लोखंडे, कुस्तीगीर संघ अध्यक्ष पंडित मोकाशी, सोसायटी चेअरमन माणिक अल्हाट, स्वयमं प्रदेशाध्यक्ष मेघा पवार, राष्ट्रवादी उपाध्यक्ष रवींद्र सोनवणे, उद्योजक प्रकाश अल्हाट, उद्योजक संतोष सस्ते, सामाजिक कार्यकर्ते राघू बनकर, बबन आल्हाट, दैतुरे मामा, आशा मिसाळ, रोहिदास हवालदार, उद्योजक प्रदीप अल्हाट, उद्योजक संदीप अल्हाट, धर्माजी अल्हाट, हिरामण अल्हाट, बाबासाहेब अल्हाट, अर्जुन बनकर, राजू शेठ सस्ते, रामदास बोराटे व राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजपा व महायुतीचे घटक पक्षातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### भोसरीत आढळराव पाटील यांचे शक्तीप्रदर्शन

» शिरूर लोकसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे भोसरी विधानसभा प्रचार दौऱ्यात जंगी स्वागत करण्यात आले. आढळराव पाटील समर्थक व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी यानिमित्ताने जोरदार शक्तिप्रदर्शन केले आहे. महायुतीचे शिरूर लोकसभेचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आज भोसरी विधानसभा प्रचार दौरा केला. या निमित्त मोशी येथे भेटी-गाठी केल्या आहेत. त्यावेळी त्यांचे पुष्पवृष्टी करून फटाक्यांच्या अतिषबाजित स्वागत केले. यावेळी शिवसेना उपनेते इरफान सय्यद, राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष अजित गव्हाणे, पुणे जिल्हा नियोजन समिति सदस्य विजय फुगे, पिंपरी-चिंचवडचे माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेवक वसंत बोराटे, राष्ट्रवादी काँग्रेस शहर उपाध्यक्ष अतिष बारणे, राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी सेना शहराध्यक्ष यश साने, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट व शिवयोद्धा ग्रुपचे अध्यक्ष गणेश सस्ते यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# खोट्या गॅरंटीच्या भुलथापांना मतदार बळी पडणार नाहीत!

## संजोग वाघेरे पाटील: कर्जतमध्ये मेळाव्यात संजोग वाघेरेंसाठी इंडिया फ्रंटची वज्रमूठ

। कर्जत ।प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्यांना तुम्ही दहा वर्षे संसदेत काम करण्याची संधी दिली. त्यांनी सर्वसामान्य मतदारांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी काम करणं गरजेचं होतं. पण, त्यांनी मतदारसंघातील प्रश्न सोडविण्याकडे दुर्लक्ष केले. असंख्य गावांमधील पाण्याचा प्रश्न देखील त्यांना सोडवता आला नाही. ते आता पुन्हा गॅरंटीच्या नावाखाली फक्त आश्वासने द्यायला येतील. परंतु, त्यांच्या या खोट्या गॅरंटीच्या भुलथापांना मतदार बळी पडणार नाहीत, असे मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे व इंडिया फ्रंटचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी म्हटले.**



अधिकृत उमेदवार संजोग संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ कर्जत येथे इंडिया फ्रंटचा संयुक्त मेळावा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. या मेळाव्याप्रसंगी कर्जत खालापूर विधानसभा उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार) जिल्हाध्यक्ष सुरेश टोकरे, गोपाळ शेळके, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका सरचिटणीस रामशेठ राणे, कॉंग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष संजय गवळी, तालुका अध्यक्ष शंकर भुसारी, शिवसेनेचे तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, कम्युनिस्ट पार्टीचे सदस्य दिनानाथ देशमुख, महिला संघटिका सुवर्णा जोशी, माई कोतवाल, हिराजी पाटील, शेतकरी महिला आघाडीच्या मंदाताई म्हात्रे यांच्यासह इंडिया आघाडीचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, कित्येक वर्षापासून आम्ही पिंपरी चिंचवड शहरात सामाजिक आणि राजकीय काम करताना विचार करत होतो की, मावळच्या मतदारांनी निवडून दिलेला माणूस चांगला काय करत असावा. परंतु, दहा वर्षांत त्यांनी काम केले नाही. हे मतदारसंघातील आमच्या महिला भगिनींना पाण्यासाठी दोन-तीन किलोमीटर जावे लागत असल्याचे पाहिल्यानंतर लक्षात येते. अत्यंत जिवाळ्याचा प्रश्न म्हणजे पाणी हा जलजीवनाचा प्रश्न सोडविता का आलेला नाही, असा सवाल करत वाघेरे पाटील यांनी टीका केली. मतदारसंघात काहि ग्रामीण भागात पाणी प्रश्न सोडवून महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरविण्यासाठी आपण काम करु, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

### आपल्याला त्यांचे नाव घ्यायचे नाही

» पिंपरी चिंचवड सारख्या शहरात अनेक वर्षे काम करताना राजकारणातील प्रामाणिकपणा जपण्याचा कायम प्रयत्न केला आहे. परंतु खासदार त्याच शहरातील असताना ते मला ओळखत नाहीत, असं म्हणत आहेत. त्यांना माझ्याबद्दल माहिती नसेल, पण आपल्याला त्यांच्याबद्दल काही बोलायचे नाही. त्यांच्याबद्दल काही बोलले की ते चिडतात आणि चुकीचे आरोप करतात, अशी टीका देखील यावेळी संजोग वाघेरे पाटील यांनी केली.

### चिंचोली (ता. कर्जत) येथे हरिनाम सप्ताहाला भेट

» प्रभू श्री राम नवमीनिमित्त चिंचोली (ता.कर्जत) येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळ उपस्थित ज्येष्ठ नागरिकांचे आशिर्वाद घेतले. यावेळी महाविकास आघाडीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते संख्येने उपस्थित होते.


# पुस्तकवेडे आणि बाकीचे सगळे!



भूमिका

**ग्रंथदालनं ही समाजासाठी नक्की काय करतात, तर वाचकांच्या बौद्धिक सजगतेला वाढवत त्यांच्यात प्रश्न-उत्तरांची आवर्तनं घडवतात. सांस्कृतिक अभिसरणाला चालना देतात. मंगळवारी साजऱ्या होणाऱ्या 'जागतिक ग्रंथदिना'निमित्त पुस्तकांच्या दुकानाचं अस्तित्व साजरं करणाऱ्या एका पुस्तकावर आणि ग्रंथपरिचयाची १२५ वर्षांची परंपरा जपणाऱ्या वृत्तपत्राच्या समृद्ध वाचनस्नेही उपक्रमाबद्दल..**

काही वर्षांपूर्वी ऑलिव्हर डार्कशायर नावाच्या माणसानं हेन्री सॉथेरन या लंडनमधल्या २६३ वर्षांच्या पुस्तकांच्या दुकानात नोकरीसाठी प्रवेश केला. वर्षभर ही नोकरी करून मग दुसरीकडे चांगल्या पगाराची नोकरी बघायची असा त्याचा विचार होता. पण जुन्या पुस्तकांनी वेढलेल्या त्या वातावरणात तो इतका रमला, की आजही तो तिथेच कार्यरत आहे. तिथल्या अनुभवांवर आधारित डार्कशायरनं लिहिलेलं 'वन्स अपॉन अ टोम: द मिसअ‍ॅडव्हेन्चर्स ऑफ अ रेअर बुकसेलर' हे रोचक आणि रसाळ पुस्तक दोन वर्षांपूर्वी प्रकाशित झालं. या पुस्तकात पुस्तकविक्रेत्याच्या आठवणी तर आहेतच, पण लंडनमधल्या वाचनसंस्कृतीचा एक उभा छेद या आठवणींतून वाचकासमोर उलगडत जातो. दोन शतकांहून अधिक काळ टिकून राहिलेल्या कोणत्याही पुस्तकांच्या दुकानाभोवती अनेक आख्यायिकांचं मोहोळ जमणं




साहजिकच आहे. या पुस्तकात निवेदनाच्या ओघात असे अनेक रोचक किस्से येतात. शंभर वर्षांपूर्वी अपघाती मृत्यू झालेल्या मालकाच्या भुताचा किस्सा हा त्यापैकीच एक. हे भूत कोणाला दिसत किंवा त्रास देत नाही. पण ज्याचं स्पष्टीकरण देता येत नाही असा दुकानात घडलेला प्रत्येक प्रसंग किंवा घटना यांचं श्रेय या भुताकडे जातं. शेल्फवरच्या पुस्तकांनी स्वत:हून जागा बदलणं, कुलूपबंद कपाटं आपोआप उघडणं आणि आतली पुस्तकं फडफडणं, बाथरूमच्या पाइपमधून विचित्र आवाज येणं असे प्रकार दुकानात वारंवार घडत असतात. लेखकानं सांगितलेले शापित पुस्तकांचे किस्सेही मजेशीर आहेत. उमर खय्यामच्या रूबाईयात या प्रसिद्ध पुस्तकाची एक अति महागडी प्रत सॉथेरनकडे होती. तिची किंमत एवढी जास्त होती की ती विकत घ्यायला कुणीही तयार होईना. या जास्त किमतीचं कारण म्हणजे पुस्तकाचं रत्नजडित बाइंडिंग. शेवटी कंटाळून मालकानं ते पुस्तक अमेरिकेतल्या एका प्रदर्शनात विक्रीसाठी ठेवायचा निर्णय घेतला. पण कस्टम खात्यानं त्या पुस्तकावर जो कर आकारला तो द्यायला मालकानं नकार दिला. त्यामुळे ते पुस्तक गेल्या पावली परत आलं. शेवटी ते लिलावात अगदी कमी किमतीला विकलं गेलं. ते ज्यानं विकत घेतलं तो गॅब्रियल वेल्स नावाचा अमेरिकन माणूस होता. तो परतीच्या प्रवासाला निघाला टायटॅनिकमधून. त्या बोटीबरोबरच अर्थातच ते पुस्तक समुद्रतळाशी बुडालं. अजब गोष्ट अशी की त्यानंतर महिन्याभरातच त्या पुस्तकाचा बाइंडरही बुडून मरण पावला. यानंतर लेखक म्हणतो. "ज्यांचा पुस्तकांच्या शापित असण्यावर विश्वास नसतो, त्यांना तसा अनुभव आलेला नसतो इतकंच." या पुस्तकातलं हेन्री सॉथेरन हे केवळ पुस्तकांचं दुकान नसून गतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा दुवा आहे. या २६३ वर्षांच्या पुस्तकांच्या दुकानाचा अवकाश गतकाळात घट्ट रुजलेला आहे. मात्र त्यात फक्त हळवा नॉस्टॅल्जिया नाही, तर परंपरा आणि इतिहास यांचं डोळस भान आहे. त्यामुळे इथे पुस्तकविक्रेता केवळ क्रय-विक्रयाचा व्यवहार करणारा व्यापारी नसून सांस्कृतिक प्रतिनिधी आहे. त्याला ग्रंथव्यवहाराविषयी उत्कट आस्था आहे आणि आपल्यावर असलेल्या अदृश्य सांस्कृतिक जबाबदारीची प्रखर जाणीव आहे. हे दुकान भूतकाळात रुतून राहिलेलं नाही, तर काळाबरोबर बदलत गेलेलं आहे. ते हट्टीपणे न बदलता तसंच राहिलं असतं, तर दोनशे वर्षे टिकूच शकलं नसतं, असं लेखक म्हणतो. या दैनंदिन ग्रंथव्यवहाराचं वर्णन करताना तिरकस विनोद अनेक ठिकाणी सहजतेनं येतो. त्यात ग्राहकांच्या तऱ्हेवाईक मागण्या आहेत, सहकाऱ्यांच्या स्वभावातल्या विसंगती आहेत, पुस्तकांच्या नावावरून होणाऱ्या गफलती आहेत. जगण्याच्या गद्य व्यवहारांतल्या अनागोंदीतला हा विनोद डार्कशायरच्या सूक्ष्म दृष्टीनं अलगद टिपला आहे. दुकानात विविध कार्यक्रमांचं आयोजन करताना उडालेला गोंधळ असो किंवा जीर्ण पुस्तकं हाताळताना उडणारी तारांबळ असो लेखकाची दृष्टी त्यातलं गांभीर्य न गमावता मासा पकडणाऱ्या बगळ्यासारखी त्यातला विनोद नेमका पकडते.

## संपादकीय »

# सुरक्षित साम्राज्य!

***उद्योगपूरक शिक्षण द्यायला हवेच, पण आपले म्हणून काही निर्माण करायचे असेल, तर नवे शोधू पाहणाऱ्याला प्रोत्साहनही द्यायला हवे, त्याचे काय?***

शास्त्रज्ञ म्हणजे कुणी तरी जाडजूड चष्मा लावलेली, अंगात पांढरा अंगरखा घातलेली, समोर विविध प्रकारची रसायने किंवा उपकरणांवर काम करत असलेली बुजुर्ग व्यक्ती, अशी बहुसंख्य भारतीयांची धारणा असते. हस्तिदंती मनोऱ्यात बसून कशावर तरी संशोधन करणारे ते शास्त्रज्ञ, इतकीच आपली शास्त्रज्ञ आणि संशोधनाबद्दलची सर्वसाधारण समज. संशोधनातून नेमके काय निर्माण व्हायला हवे, याचे आपले आकलन इतके मर्यादित आहे, की आंतरजालावर 'गुगल' करण्यालाही आपण 'रिसर्च' म्हणतो. साहजिकच २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याचे ध्येय गाठायला निघालेल्या राष्ट्राला चांगल्या संशोधनावर किती भर द्यावा लागणार आहे आणि आत्ता सध्या त्याची काय अवस्था आहे, याची किमान माहिती असण्याची अपेक्षा बाळगणेही व्यर्थच. पण, म्हणूनच कुणा जाणत्याने ही वस्तुस्थिती परखडपणे मांडण्याचे महत्व.

सध्या आपल्याकडे सुरू असलेल्या 'लोकशाहीच्या सर्वात मोठ्या' वगैरे उत्सवाच्या मांडवात लवकरच आणखी एक उत्सव साजरा केला जाईल. एलॉन मस्क भारतात येतोय. आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं जे स्थान तीच आंतरराष्ट्रीय उद्योगात मस्कची प्रतिमा.

# येणार येणार म्हणता म्हणता आलाच नाही

गेल्या वर्षी त्यानं 'ट्विटर' घेतल्यापासनं जगाला तो जरा जास्तच कळायला लागला. त्याच्या मालकीचं ट्विटर- आता एक्स -आहे. त्याच्या मालकीचा उपग्रह आहे. उपग्रह प्रक्षेपक कंपनीचा तो मालक आहे. उपग्रहामार्फत दळणवळण सेवा देणारी कंपनी त्याची आहे. आणि 'टेस्ला' तर त्याचीच. या 'टेस्ला'साठी तो आपल्याकडे येणार आहे. त्याची भेट ही म्हणजे उत्सवच असेल. टिम कुक, सुंदर पिचाई, मार्क झकरबर्ग, बिल गेट्स, जेफ बेझोस वगैरे व्यक्ती त्यांच्या त्यांच्या उद्योगांमुळे दंतकथा बनून गेल्यात. आणि त्यामुळे हे कथानायक आपल्याकडे येतात तेव्हा त्यांचं जंगी स्वागत होतं, आपल्याकडची पॉवरफुल माणसं त्यांना मिठ्या मारतात, त्याची छायाचित्रं माध्यमांत झळकतात, आपल्या पॉवरफुलांमुळे येणाऱ्या पाहुण्यांचे डोळे कसे दिपले वगैरे भाकडकथा घोळवून घोळवून सांगितल्या जातात आणि या पाहुणचारामुळे भारावलेले हे कथानायक मग माध्यमांना 'बाईट'



देतात: भारत हेच आता जगाचं आशास्थान आहे.. भारताची प्रगती स्तिमित करणारी आहे.. भारताचं नेतृत्व अतुलनीय आहे.. वगैरे. छान वाटतं आपल्या या प्रगतीच्या कथा इतरांकडून ऐकताना. आता मस्क आल्यावरही हे सगळं काही होईल. थोडंसं कदाचित जास्तही होईल. म्हणजे त्याचा लौकिक लक्षात घेता आणि आपल्याकडचा लोकशाहीतला सुरू असलेला सर्वात मोठा उत्सव वगैरे लक्षात घेता मस्क न जाणो 'अगली बार.. चारसो पार' वगैरे घोषणाही देऊन जाईल. शेवटी तो मस्क आहे. निवडणूक आचारसंहिता भंग वगैरे मुद्दे त्याला थोडेच लागू होतात? परत काही कोट रुपयांच्या गुंतवणुकीची आशा तो दाखवू शकतो. या घोषणेचा लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवात फायदाही होऊ शकतो. या मस्कची व्यक्तिरेखा सादर करणं हा काही इथला विषय नाही. त्यामुळे त्यानं बोलिव्हियात लिथियमच्या खाणींवर ताबा मिळावा यासाठी काय काय उद्योग केले, त्या देशात मस्कविरोधात आंदोलन का झालं, बॅटऱ्यात अत्यावश्यक असलेलं कोबाल्ट तो कसं मिळवतो वगैरे मुद्द्यांची चर्चा करण्याची गरज नाही. आपल्याला विचारात घ्यायचाय एकच मुद्दा. भारताला भेट द्यावी, इथल्या गुंतवणुकीसाठी प्रयत्न करावेत असं मस्क याला आताच का वाटलं? गेले जवळपास दशकभर प्रयत्न सुरू होते मस्कनं भारतात यावं यासाठी. आपले दिल्लीतले आणि काही राज्यांतलेही राजकारणी डोळ्यात प्राण एकवटून वाट पहात होते त्याच्या आगमनाची. मस्क येईल, गुंतवणुकीची घोषणा करेल आणि त्याच्यासमवेत मोठ्या विजयी मुद्रेनं आपल्याला छायाचित्रं काढता येतील.. ही आशा किती जणं बाळगून होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# माझ्यावर वेगवेगळे आरोप केले जातात!

## आरोपामुळे मला काय भोकं पडत नाही : अजित पवार

। नगर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बारामती लोकसभा मतदारसंघातील लढत दिवसेंदिवस रंगत जात आहे. नणंद-भावजयीमधील या लढतीकडे अवघ्या राज्याचं लक्ष आहे. दरम्यान, सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे यांनी प्रचाराचा नारळ फोडला असून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप सुरू झाले आहेत. तर, अजित पवारांनीही यात आता उडी मारली असून सुनेत्रा पवारांसाठी त्यांनी अनेक सभा गाजवल्या आहेत. आजच्या बारामती येथील सभेतही त्यांनी शरद पवार आणि त्यांच्या समर्थकांवर टीका केली आहे.**



गावकी-भावकीची ही निवडणूक नाही. ही देशाची निवडणूक आहे. देशाच्या १३५ कोटी जनतेचा कारभार कोणाच्या हातात द्यायचा हे ठरवणारी ही निवडणूक आहे. ही निवडणूक सासू-सुनेची, नणंद भावजयीची निवडणूक नाही. ही भावकीची निवडणूक नाही ही मोदी साहेब आणि राहुल गांधींची निवडणूक आहे, असं अजित पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले, "माझ्यावर वेगवेगळे आरोप केले जातात. पण त्यांच्या आरोपामुळे मला काय भोकं पडत नाही. बारामतीची जनता मला अनेक वर्षे ओळखते. माझं लहाणपण येथेच गेलंय. बारामतीतील सर्व स्थित्यंतराचे बारामतीतील वडिलधारी लोक साक्षीदार आहेत."लोकांना भावनिक केलं जातं. कालच्या शरद पवारांच्या सभेत अमेरिका टाईम्सचा पत्रकारासह अनेक पत्रकार मंडळी आली होती. यावेळी शरद पवार खुर्चीवर बसले होते. तर सुप्रिया, रोहित आणि युगेंद्र पायापाशी बसले होते. अख्ख कुटुंब जवळ घेऊन बसले होते. म्हणजे हे अमेरिकेतही पोहोचलं की बघा कुटुंब कसं एक आहे. पण मी त्यांच्याबरोबर होतो तेव्हा साहेब एकेठिकाणी बसले असतील तर मी दुसरीकडे बसायचो", असं अजित पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले, ती (रोहित पवारांसह इतर भावकीतील मुलं) माझीही मुलं आहेत. शरद पवारांनी मला खासदार केल्यावर एकाचा जन्म झाला. आणि काल तो सांगतो की साहेबांनी सर्व संस्था काढल्या. केलं मग? ३१-३२ वर्षे मी नुसताच शांत बसलो. मी काहीच केलं नाही. बारामती जी काही सुधारली ती इतरांमुळे सुधारली. अजितचा काडीचा संबंध नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. "बारामतीकरांनो छत्रपती सहकारी साखर कारखाना कोणी आणला? जाचकबंधूंनी आणला. माळेगाव सहकारी साखर कारखाना शेंबेकर, जाधवरावांनी आणला. सोमेश्वर कारखाना मुकुटराव आप्पांनी आणला. हे सर्व जगजाहीर आहे. खरेदी विक्री संघ पूर्वीच होता, आपल्या काळात नाही निघाला. त्यानंतर बारामती बँक पूर्वीच होती. मार्केट कमिटी कधीची आहे, फार पूर्वीपासूनची आहे. नगरपालिका १८६५ मधली आहे. तुमचा आमचाही जन्म झाला नव्हता. पण ते म्हणतात संस्था त्यांनी काढल्या, पण जन्म झाला नव्हता. काय डोकं चालतंय?", असा उपहासात्मक टोला त्यांनी लगावला. बारामती लोकसभा मतदारसंघातील लढत दिवसेंदिवस रंगत जात आहे. नणंद-भावजयीमधील या लढतीकडे अवघ्या राज्याचं लक्ष आहे.

### मला खासदार केल्यावर एकाचा जन्म

गावकी-भावकीची ही निवडणूक नाही. ही देशाची निवडणूक आहे. देशाच्या १३५ कोटी जनतेचा कारभार कोणाच्या हातात द्यायचा हे ठरवणारी ही निवडणूक आहे. ही निवडणूक सासू-सुनेची, नणंद भावजयीची निवडणूक नाही. ही भावकीची निवडणूक नाही ही मोदी साहेब आणि राहुल गांधींची निवडणूक आहे, असं अजित पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले, "माझ्यावर वेगवेगळे आरोप केले जातात. पण त्यांच्या आरोपामुळे मला काय भोकं पडत नाही. बारामतीची जनता मला अनेक वर्षे ओळखते. माझं लहाणपण येथेच गेलंय. बारामतीतील सर्व स्थित्यंतराचे बारामतीतील वडिलधारी लोक साक्षीदार आहेत."लोकांना भावनिक केलं जातं. कालच्या शरद पवारांच्या सभेत अमेरिका टाईम्सचा पत्रकारासह अनेक पत्रकार मंडळी आली होती. पण मी त्यांच्याबरोबर होतो तेव्हा साहेब एकेठिकाणी बसले असतील तर मी दुसरीकडे बसायचो", असं अजित पवार म्हणाले. ते पुढे म्हणाले, ती (रोहित पवारांसह इतर भावकीतील मुलं) माझीही मुलं आहेत. शरद पवारांनी मला खासदार केल्यावर एकाचा जन्म झाला.

# आता पदवीनंतर पीएच.डी.ला मिळणार थेट प्रवेश!

## युजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेमध्ये (युजीसी नेट) एक मोठा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार चार वर्षे, आठ सत्रांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहे. विद्यार्थ्याने ज्या विषयात पदवी मिळवली असेल, त्या विषयात पीएच. डी. करता येणार आहे.**




यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांनी एक्स या समाजमाध्यमाद्वारे ही माहिती दिली. सहायक प्राध्यापक पदासाठी, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसाठी युजीसी-नेट ही परीक्षा राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणामार्फत (एनटीए) वर्षातून दोनवेळा घेतली जाते. डिसेंबर आणि जून अशा सत्रांत ही परीक्षा होते. अलीकडेच युजीसीने घेतलेल्या निर्णयानुसार पीएच. डी.साठी नेट परीक्षेतून प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठांतर्फे घेतल्या जाणाऱ्या पीएच.डी. प्रवेश परीक्षेची आवश्यकता संपुष्टात आली आहे. युजीसी-नेट परीक्षेची नोंदणी प्रक्रिया सुरू केली जाणार असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रा. एम. जगदेशकुमार यांनी बदलाची माहिती दिली. या पूर्वीच्या नियमानुसार युजीसी नेट परीक्षा देण्यासाठी उमेदवार पदव्युत्तर पदवीधारक असणे आवश्यक होते. तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला असलेल्या विषयात उमेदवारांना पीएच.डी. करता येत होती. प्रा. जगदेशकुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटतील उमेदवारांना नेट परीक्षा देता येणार आहे.

### वर्षातून दोनवेळा घेतली जाते परीक्षा

चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील कोणत्याही शाखेच्या उमेदवारांना त्यांना ज्या विषयात पीएच.डी. करायची आहे त्यासाठी परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली आहे. जून २०२४च्या सत्रापासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोग राष्ट्रीय पात्रता परीक्षेमध्ये (युजीसी नेट) एक मोठा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार चार वर्षे, आठ सत्रांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा देता येणार आहे. विद्यार्थ्याने ज्या विषयात पदवी मिळवली असेल, त्या विषयात पीएच.डी. करता येणार आहे. यूजीसीचे अध्यक्ष प्रा. एम. जगदेशकुमार यांनी एक्स या समाजमाध्यमाद्वारे ही माहिती दिली. सहायक प्राध्यापक पदासाठी, कनिष्ठ संशोधन पाठ्यवृत्तीसाठी युजीसी-नेट ही परीक्षा राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणामार्फत (एनटीए) वर्षातून दोनवेळा घेतली जाते. डिसेंबर आणि जून अशा सत्रांत ही परीक्षा होते.

# मला लोकांसमोर खोटं पाडलं!

## ठाकरेंनी नोटबंदीच्या मुद्द्यावरून मोदींना लक्ष्य केलं

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागलं आहे. पहिल्या टप्प्यात २९ राज्यांमद्ये १०२ जागांसाठी मतदान पार पडलं आहे. जवळपास ५५ टक्के मतदान झालं असून मतांची टक्केवारी राजकीय विश्लेषकांसाठी चिंतेचा विषय ठरली आहे. महाराष्ट्रात अजूनही मतदानाचे ४ टप्पे शिल्लक आहेत. या पार्श्वभूमीवर इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या सविस्तर मुलाखतीमध्ये उद्धव ठाकरेंनी अनेक राजकीय मुद्द्यांवर भाष्य केलं आहे. यावेळी त्यांनी आघाडी सरकार स्थापन करण्यासंदर्भात भूमिका मांडतानाच भाजपासोबत पुन्हा जाण्याच्या शक्यतेवरही भाष्य केलं.**

यावेळी उद्धव ठाकरेंनी भाजपा वापरा व फेकून द्या या तत्वानुसार काम करत असल्याची टीका केली. “२०१९च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी शिवसेना व भाजपाला प्रत्येकी अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद देण्याचं ठरलं होतं. देवेंद्र फडणवीसांनी आदित्यला मुख्यमंत्रीपदासाठी तयार करण्याचं वचन दिलं होतं. ते स्वत: दिल्लीत जाणार होते. पण आता त्यांनी मला माझ्याच लोकांसमोर खोटं पाडलं”, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी त्यांचा संताप व्यक्त केला.दरम्यान, उद्धव ठाकरेंनी नोटबंदीच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य केलं. “भारतीय जनता पक्षाची गॅरंटी पोकळ आहे. नोटबंदीनंतदर मोदी म्हणाले होते की ‘मला फक्त १०० दिवस द्या’. एप्रिल २०२४मध्ये त्या गोष्टीला २७०० दिवस झाले. काय झालं? ते म्हणाले होते की ते शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करतील. पण त्याऐवजी शेतकऱ्यांचा खर्च दुप्पट झाला आहे”, असं उद्धव ठाकरे म्हणाले.सर्वात मोठी समस्या काय आहे? यावर उद्धव ठाकरेंनी केंद्र सरकारबाबत भूमिका मांडली. “माझ्यााठी सर्वात मोठी समस्या ही आहे की मला भारत सरकार हवंय, मोदी



सरकार नाही. जर एकच पक्ष प्रबळ असेल, तर हे देशासाठी धोकादायक आहे. माझ्या वडिलांच्या काळात आम्हाला असं वाटलं की एक प्रबळ सरकार केंद्रात असायला हवं. पण अटल बिहारी वाजपेयींनी आघाडी सरकार यशस्वीपणे चालवलं. नरसिंह राव यांच्या सरकारनं आर्थिक सुधारणा आणल्या. आता काळ बदलला त्याप्रमाणे देशाला असं सरकार हवंय जे अनेक पक्षांना सोबत घेऊन वाटचाल करेल”, असं उद्धव ठाकरे म्हणाले.दरम्यान, यावेळी उद्धव ठाकरेंनी पुन्हा भाजपासोबत जाण्याबाबतही भाष्य केलं. भविष्यात पुन्हा भारतीय जनता पक्षासोबत युती होण्याची शक्यता वाटते का? असा प्रश्न विचारताच उद्धव ठाकरे म्हणाले, “मी असं का करेन? माझी अनेकदा फसवणूक झाली आहे. माझ्या दृष्टीने भाजपाचा खरा चेहरा आता उघड झाला आहे”, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी भविष्यात पुन्हा ते भाजपासोबत जाण्याची शक्यता फेटाळून लावली.दरम्यान, केंद्रात आघाडीचं सरकार आलं आणि ठाकरे गट त्या सरकारचा हिस्सा असल्यास पुन्हा भारत-पाकिस्तान सामने होऊ देणार का? असा प्रश्न या मुलाखतीत उद्धव ठाकरेंना विचारण्यात आला. तेव्हा त्यावर बोलताना त्यांनी मोदींना लक्ष्य केलं. “मी नक्कीच (मोदींप्रमाणे) नवाज शरीफ यांच्यासोबत केक खाणार नाही. भाजपा फक्त पाकिस्तानबद्दल बोलते. पण ते चीनबद्दल उत्तर का देत नाही? चीन आपल्या हद्दीत येत आहे, आपल्या भूभागाची नावं बदलत आहे. चीन काही क्रिकेट खेळत नाहीये”, असं ते म्हणाले.यावेळी उद्धव ठाकरेंनी भाजपा वापरा व फेकून द्या या तत्वानुसार काम करत असल्याची टीका केली. “२०१९च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी शिवसेना व भाजपाला प्रत्येकी अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद देण्याचं ठरलं होतं. देवेंद्र फडणवीसांनी आदित्यला मुख्यमंत्रीपदासाठी तयार करण्याचं वचन दिलं होतं.

### भाजपाचा खरा चेहरा उघड झाला

» २०२४मध्ये त्या गोष्टीला २७०० दिवस झाले. काय झालं? ते म्हणाले होते की ते शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करतील. पण त्याऐवजी शेतकऱ्यांचा खर्च दुप्पट झाला आहे”, असं उद्धव ठाकरे म्हणाले.सर्वात मोठी समस्या काय आहे? यावर उद्धव ठाकरेंनी केंद्र सरकारबाबत भूमिका मांडली. “माझ्यााठी सर्वात मोठी समस्या ही आहे की मला भारत सरकार हवंय, मोदी सरकार नाही. जर एकच पक्ष प्रबळ असेल, तर हे देशासाठी धोकादायक आहे. माझ्या वडिलांच्या काळात आम्हाला असं वाटलं की एक प्रबळ सरकार केंद्रात असायला हवं. पण अटल बिहारी वाजपेयींनी आघाडी सरकार यशस्वीपणे चालवलं. नरसिंह राव यांच्या सरकारनं आर्थिक सुधारणा आणल्या. आता काळ बदलला त्याप्रमाणे देशाला असं सरकार हवंय जे अनेक पक्षांना सोबत घेऊन वाटचाल करेल”, असं उद्धव ठाकरे म्हणाले.दरम्यान, यावेळी उद्धव ठाकरेंनी पुन्हा भाजपासोबत जाण्याबाबतही भाष्य केलं. भविष्यात पुन्हा भारतीय जनता पक्षासोबत युती होण्याची शक्यता वाटते का? असा प्रश्न विचारताच उद्धव ठाकरे म्हणाले, “मी असं का करेन? माझी अनेकदा फसवणूक झाली आहे. माझ्या दृष्टीने भाजपाचा खरा चेहरा आता उघड झाला आहे.

# टेस्लाची भारतातील गुंतवणूक लांबली!

## एलॉन मस्क यांनी दौरा पुढे ढकलला! नव्या दौऱ्याबाबत दिले संकेत

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**टेस्लाचे प्रमुख एलॉन मस्क हे पंतप्रधान नरेंद्र यांच्या भेटीसाठी भारत दौऱ्यावर येणार होते. भारतात ते कंपनीकडून भारतात २ ते ३ अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीची घोषणा करण्याची अपेक्षा होती. परंतु, हा दौरा त्यांनी पुढे ढकलला आहे. ANI ने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**

फार मोठ्या जबाबदाऱ्यांमुळे भारत भेट लांबणीवर पडली आहे. परंतु, मी यावर्षाच्या शेवटी भारतात




येण्यास उत्सुक आहे, अशी पोस्ट एलॉन मस्क यांनी केली आहे.एलॉन मस्क २३ एप्रिल रोजी भारतात येणार होते. भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेऊन गुंतवणुकीची योजना जाहीर करणार होते. भारत ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची मोठी वाहन बाजारपेठ असून त्यात आता टेस्लाचाही सहभा होणार आहे. यासाठी ही भेट नियोजित करण्यात आली होती. टेस्लासाठी अमेरिका आणि चीन या मोठ्या बाजारपेठा आहेत. तेथे विक्री कमी झाल्याने मनुष्यबळात १० टक्के कपात करण्याची घोषणा करण्यात आली आहे. टेस्लाने मुंबई आणि दिल्लीत नवीन दालनांसाठी जागांचा शोध सुरू केला आहे. कंपनीच्या बर्लिनमधील उत्पादन प्रकल्पात उजव्या बाजूला चालक आसन असलेल्या मोटारींचे उत्पादनही सुरू झाले आहे. तिथून भारतात मोटारी निर्यात केल्या जातील.परंतु, टेस्लाच्या पहिल्या तिमाहीतील कामगिरीबाबत चर्चा करण्याकरता अमेरिकेतील महत्त्वाच्या बैठकीसाठी एलॉन मस्क यांना २३ एप्रिल रोजी जावं लागणार आहे.

### आयात शुल्कात कपातीमुळे निर्णय

» त्यामुळे हा पूर्वनियोजित दौरा रद्द करण्यात आल्याचे वृत्त इंडिया टुडेने दिले आहे.मस्क यांनी गेली अनेक वर्षे भारतात आकारण्यात येणाऱ्या जास्त आयात शुल्काला विरोध केला होता. यात बदल व्हावा, अशी आग्रही भूमिकाही त्यांनी घेतली होती. केंद्र सरकारने मार्च महिन्यात नवीन ई-व्ही धोरणात आयात शुल्क १०० टक्क्यांवरून १५ टक्क्यांवर आणले आहे. देशात ५० कोटी डॉलरची गुंतवणूक करून उत्पादन प्रकल्प सुरू करणाऱ्या मोटार निर्मिती कंपन्यांसाठी हे धोरण आहे. त्यामुळे टेस्लाकडून ही गुंतवणूक केली जाणार आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले.टेस्लाचे प्रमुख एलॉन मस्क हे पंतप्रधान नरेंद्र यांच्या भेटीसाठी भारत दौऱ्यावर येणार होते. भारतात ते कंपनीकडून भारतात २ ते ३ अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीची घोषणा करण्याची अपेक्षा होती. परंतु, हा दौरा त्यांनी पुढे ढकलला आहे. ANI ने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

# बिश्नोईच्या भावाने घेतली होती सलमानवर हल्ल्याची जबाबदारी

बॉलीवूड अभिनेता सलमान खान सध्या त्याच्या राहत्या घरावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे चर्चेत आहे. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई सध्या तुरुंगात बंद आहे, पण त्याच्या नावाने कॅब बुक करून ती अभिनेता सलमान खानच्या वांद्रे येथील घरी पाठवल्याप्रकरणी गाझियाबादच्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली. रोहित त्यागी असं अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचं नाव आहे. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, रोहितला त्याच्या गावातून अटक करण्यात आली. त्याने बुधवारी कथितरित्या सलमान खान राहत असलेल्या गॅलेक्सी अपार्टमेंट्सपासून वांद्रे पोलीस स्टेशनपर्यंतच्या प्रवासासाठी ऑनलाइन कॅब बुक केली. जेव्हा कॅब ड्रायव्हर पत्त्यावर पोहोचला तेव्हा त्याला समजलं की कुणीतरी खोडसाळपणा केलाय, मग कॅब चालकाने तक्रार दाखल केली.सलमान खानच्या घरावर १४ एप्रिल रोजी गोळीबार झाला, त्यामुळे सुरक्षा वाढविण्यात आली आहे. याचदरम्यान घडलेल्या या घटनेची गंभीर दखल घेत वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यागीचा शोध घेतला आणि त्याला अटक करण्यात आली आहे. गेल्या रविवारी सलमानच्या घरावर हल्ला करणाऱ्या दोन आरोपींना दुसऱ्याच




दिवशी अटक करण्यात आली असून ते आता पोलीस कोठडीत आहेत. या हल्ल्याची जबाबदारी गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोईने घेतली होती.सलमानच्या घरावर गोळ्या झाडणारे विकी गुप्ता व सागर पाल दोघेही बिहारचे रहिवासी आहेत. त्यांना घटनेच्या दुसऱ्या दिवशी गुजरातमधील भुज इथून अटक करण्यात आली होती. सलमान खानला मारणं नाही, तर फक्त घाबरवणं हा गोळीबाराचा हेतू होता. गोळीबार करण्यासाठी चार लाख रुपयांची सुपारी घेतल्याचं दोन्ही आरोपींनी पोलिसांना सांगितलं होतं. बॉलीवूड अभिनेता सलमान खान सध्या त्याच्या राहत्या घरावर झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे चर्चेत आहे. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई सध्या तुरुंगात बंद आहे, पण त्याच्या नावाने कॅब बुक करून ती अभिनेता सलमान खानच्या वांद्रे येथील घरी पाठवल्याप्रकरणी गाझियाबादच्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

## भारतीय अभिनेत्री पाकिस्तान दौऱ्यावर

७० च्या दशकातील दिग्गज अभिनेत्री मुमताज खूप लोकप्रिय आहेत. आता त्या चित्रपटांमध्ये काम करत नसल्या तरी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. त्या इन्स्टाग्रामवर त्यांचे फोटो व व्हिडीओ शेअर करत असतात. त्या अनेक विषयांवर आपली मतं मांडत असतात. मुमताज सध्या पाकिस्तानला गेल्या आहेत, तिथून त्यांनी काही फोटो व व्हिडीओ शेअर केले आहेत. मुमताज या व्हिडीओंमध्ये हाउस पार्टीचा आनंद लुटताना दिसत आहेत. त्यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये अनेक पाकिस्तानी कलाकार दिसत आहेत. त्यांनी पाकिस्तानी गायक गुलाम अली यांच्याबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे.दरम्यान, मुमताज काही दिवसांपूर्वी झीनत अमान यांच्यावर टीका केल्यामुळे चर्चेत होत्या. झीनत यांनी तरुणांना लग्नाआधी लिव्ह इनमध्ये राहण्याचा सल्ला दिला होता.

## आरुषीने गुपचूप लग्न उरकलं

'लव्ह आज कल २' फेम अभिनेत्री आरुषी शर्माने गुपचूप लग्न उरकलं आहे. तिच्या लग्नाचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अभिनेत्रीने बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टरशी लग्नगाठ बांधली आहे. तिने अद्याप लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले नाही, पण तिच्या लग्नात हजर असलेल्या मंडळींनी काही फोटो पोस्ट केले आहेत. 'काला पानी' या वेब सीरिजमध्ये शेवटची दिसलेली आरुषी शर्माने आयुष्यभरासाठी तिचा जोडीदार निवडला आहे. अभिनेत्रीने १८ एप्रिल रोजी हिमाचल प्रदेशमध्ये लग्नगाढ बांधली. तिने प्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टर वैभव विशांतशी गुपचूप लग्न केलं. आरुषी आणि वैभवने अत्यंत खासगी सोहळ्यात सात फेरे घेतले. या लग्नाला फक्त त्यांचे कुटुंबीय आणि काही जवळचे मित्र उपस्थित होते.आरुषी शर्माच्या लग्नाचे फोटो खूप व्हायरल होत आहेत. ती पेस्टल रंगाचा लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. वैभवनेही खूप सुंदर अशी नक्षीदार शेरवानी घातली आहे.आत्तापर्यंत त्याने 'बडे मियाँ छोटे मियाँ', 'पीके', 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' आणि 'बदलापूर' सारख्या जवळपास ५० चित्रपटांसाठी कास्टिंगचं काम केलं आहे. विशेष म्हणजे वैभवने 'काला पानी' या वेब सीरिजसाठी कास्टिंग डायरेक्टर म्हणूनही काम पाहिलं होतं.



## राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केली

आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दिसल्यापासून चर्चेत आहे. या कॉन्सर्टमध्ये अभिनेता नेहमीपेक्षा थोडा वेगळा दिसत होता. दरम्यान, या कॉन्सर्टमधील राजकुमारचे पापाराझींनी काढलेले फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि राजकुमारने प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं. त्यावर आता राजकुमारनं मौन सोडलं आहे. नुकत्याच 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, "मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केली नाही आहे. व्हायरल झालेला फोटो फक्त एक वाईट फोटो होता,असं आपण म्हणू शकतो. त्या फोटोला टच-अप्स केले आहेत. मला खूपदा वाटतं की, माझी त्वचा अशी नितळ आणि चमकदार असती, तर किती चांगलं झालं असतं. कारण- त्या फोटोत मी तसाच दिसत होतो. मी तेव्हा कोणताच मेकअप केला नव्हता; पण मलाही वाटलं की, तो फोटो खूप विचित्र दिसत होता. कॅमेऱ्यात कैद झालेला तो एक वाईट क्षण होता. मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केलेली नाही."आठ वर्षांअगोदर मी हनुवटीसाठी काही फिलर वर्क केलेलं. कारण- मला आत्मविश्वास असल्यासारख दिसायचं होतं. तेव्हा माझ्या त्वचाशास्त्रज्ञानं मला सल्ला दिला होता आणि मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला का? तर हो. त्यानंतर मी आणखी चांगले चित्रपट केले आहेत आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला आहे. अभिनय हे दृश्य माध्यम आहे. माझा याला विरोध नाही. जर एखाद्याला त्याचा आत्मविश्वास वाढवायचा असेल आणि विज्ञान उपलब्ध असेल, तर कोणी ते का करणार नाही.



## गोविंदाची भाची आरती मंदिरात करणार लग्न

गोविंदाची भाची व अभिनेत्री आरती सिंह लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. अभिनेत्रीने सांगितलं की तिचं लग्न डेस्टिनेशन वेडिंग नसेल तर ती मंदिरात लग्न करणार आहे. आरती व दिपक यांचं अरेंज मॅरेज आहे. ते गेल्या वर्षी जुलैमध्ये भेटले होते, त्यानंतर एकत्र वेळ घालवल्यानंतर लग्न करण्याचा निर्णय घेतला. ती दिपक चौहानशी २५ एप्रिलला मुंबईतील इस्कॉन मंदिरात लग्न करणार आहे. "मी दागिने घालणार नाही किंवा लग्नाआधीचे कोणतेही कार्यक्रम नसतील, असं नाही. सर्व काही होईल. मी लूक कसा करायचा ते ठरवलंय आणि हेवी ज्वेलरी मी लग्नाच्या दिवशी घालेन. पण मला साधेपणा आवडतो, माझे लग्न इस्कॉन मंदिरात होणार आहे आणि माझी इच्छा जशी होती, तसंच सगळं घडत आहे," असं आरती म्हणाली.ती पुढे म्हणाली, "सुरुवातीला मला वाटलं की काशी विश्वनाथला जाऊन लग्न करावे, पण नंतर विचार केला की खूप नातेवाईक आहेत, इंडस्ट्रीतील मित्र आहेत. माझ्याइतकेच तेही माझे लग्नासाठी उत्साहित आहेत. माझे मित्र म्हणतायत की तू नाही बोलावलंस तरी आम्ही तुझ्या लग्नाला येऊ. अंकिता लोखंडे प्रत्येक कार्यक्रमात असणार आहे. प्रिंस नरुला ऑस्ट्रेलियाला गेला, पण युविका माझ्या लग्नासाठी थांबली. मी ही नाती कमावली आहेत आणि मी खूप आनंदी आहे."आरतीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिने 'मायका', 'थोडा है बस थोडा की जरुरत है', 'परिचय', 'उत्तरन', 'उडान', 'ससुराल सिमर का' यासारख्या टीव्ही मालिका केल्या आहेत. आरती शेवटची 'श्रावणी' मालिकेत दिसली होती. याशिवाय ती बिग बॉस १३ मध्येही सहभागी झाली होती.गोविंदाची भाची व अभिनेत्री आरती सिंह लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे.

# हैदराबादचा पुन्हा धावांचा महापूर!

## हैदराबादचा आयपीएल2024 मधील हा सलग चौथा विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**विक्रमी खेळीसह सनरायझर्स हैदराबादने दिल्ली कॅपिटल्सला ऑल आऊट करत ६७ धावांनी विजय मोठा विजय मिळवला आहे. ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्माच्या पॉवरप्लेमधील सर्वाधिक १२५ धावांच्या खेळीसह एसआरएचने २६७ धावांचा डोंगर उभारला. दिल्लीच्या फलंदाजांनीही हे लक्ष्य गाठण्याचा खूप प्रयत्न केला पण ठराविक अंतराने गमावलेल्या विकेट्समुळे संघाला या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करण्यात अयशस्वी ठरले. दिल्लीकडून जेक फ्रेझर मॅकगर्कने यंदाच्या आयपीएलमधील सर्वात जलद अर्धशतक झळकावले, पण ६८ धावा करत तो बाद झाला. हैदराबादचा आयपीएलमधील हा सलग चौथा विजय असून तिन्ही वेळेस त्यांनी २०० अधिक धावांचा डोंगर उभारला आहे.**



दिल्लीचे सलामीवीर स्वस्तात बाद झाल्याने दिल्लीची सुरूवात फारशी चांगली झाली नाही. पण पृथ्वी शॉने पहिल्या षटकातील सुरूवातीच्या ४ चेंडूवर सलग चार चौकार लगावत वादळी सुरूवात केली खरी पण संघ तो १६ धावा करत बाद झाला. त्यानंतर डेव्हिड वॉर्नर १ धाव करत बाद झाला. त्यानंतर आलेल्या फ्रेझर मॅकगर्कने संघाचा डाव उचलून धरला आणि त्याला अभिषेक पोरेलने चांगली साथ दिली. फ्रेझर मॅकगर्कने १८ चेंडूत ७ षटकार आणि ५ चौकारांसह ६५ धावांची धुव्वाधार खेळी केली. तर अभिषेक पोरेलने २२ चेंडूच १ षटकार आणि ७ चौकारांच्या मदतीने ४२ धावा केल्या. त्यानंतर आलेल्या ट्रिस्टन स्टब्सला आपल्या खेळीने छाप पाडता आला नाही आणि एकही बाऊंड्री न लगावता तो १० धावा करत बाद झाला,कर्णधार ऋषभ पंत ३५ चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारांसह ४४ धावा करत बाद झाला. तर ललित यादव ७, अक्षर पटेल ६ आणि पुढील दोन फलंदाज खातेही न उघडता नटराजनच्या गोलंदाजीवर बाद झाले आणि अशारितीने दिल्लीचा संघ केवळ १९९ धावा करत ऑल आऊट झाला. हैदराबादकडून नटराजने ४ षटकात १९ धावा देत ४ विकेट्स घेतले. तर नितीश रेड्डी आणि मयंक मार्कंडेय यांनी प्रत्येकी २ विकेट्स मिळवल्या. तर सुंदर आणि भुवनेश्वरने प्रत्येकी १ विकेट घेतली. नाणेफेक गमावत हैदराबादचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला आणि त्यांनी २६७ धावांची विक्रमी खेळी केली. हैदराबाद फलंदाजी करताना जणू गोलंदाजांची धुलाई करण्याच्या उद्देशानेच उतरलेत की काय असं वाटतं होतं. ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मने अवघ्या २.५ षटकांत ५० धावांचा आकडा गाठला. धुव्वाधार फलंदाजी करत या दोघांनी पॉवरप्लेमध्ये टी-२० मधील १२५ धावांची सर्वात मोठी धावसंख्या उभारली. त्यानंतर कुलदीप यादवने दिल्लीला सामन्यात परत आणत एकाच षटकात २ विकेट्स घेतल्या. पहिलं त्याने अभिषेक शर्माला अक्षरकडून झेलबाद केलं ज्याने त्याचा एक जबरदस्त झेल टिपला तर त्याच षटकात मारक्रमला अक्षर पटेलकडून झेलबाद केले. यानंतर त्यांच्या धावांना थोडा ब्रेक लागला, पण हेड मैदानात कायम होता. कुलदीपने हेडला पुढच्याच षटकात ट्रिस्टन स्टब्सकडून झेलबाद केले, ज्याने ३२ चेंडूत ६ षटकार आणि ११ चौकारांची तुफानी खेळी केली. स्टब्सने एक उत्कृष्ट झेल टिपत त्याला माघारी धाडले.

### हैदराबादचा 67 धावांनी विजय

नितीश रेड्डी आणि शाहबाज अहमदने संघाची धावसंख्या २६७ पर्यंत पोहोचवली. नितीश ३७ धावा करून बाद झाला तर शाहबाज अहमदने २९ चेंडूत ५ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने नाबाद ५९ धावा केल्या. तर अब्दुल समदनेही १३ धावांचे योगदान दिले. दिल्लीकडून कुलदीप यादवने ४ षटकात ५५ धावा देत ४ विकेट्स घेतले तर मुकेश कुमार आणि अक्षरने प्रत्येकी एक विकेट मिळवली. विक्रमी खेळीसह सनरायझर्स हैदराबादने दिल्ली कॅपिटल्सला ऑल आऊट करत ६७ धावांनी विजय मोठा विजय मिळवला आहे. दिल्लीच्या फलंदाजांनीही हे लक्ष्य गाठण्याचा खूप प्रयत्न केला पण ठराविक अंतराने गमावलेल्या विकेट्समुळे संघाला या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करण्यात अयशस्वी ठरले.

# मॅकगर्कने झळकावले सर्वात जलद अर्धशतक

## फ्रेझर-मॅकगर्कने अवघ्या 15 चेंडूच अर्धशतक झळकावले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**दिल्ली कॅपिटल्सच्या २२ वर्षीय फ्रेझर-मॅकगर्कने अवघ्या १५ चेंडूच अर्धशतक झळकावले आहे. हैदराबादने दिलेल्या २६७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीचे सलामीवीर स्वस्तात बाद झाले. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या फ्रेझरने विस्फोटक फलंदाजी करत १५ षटकांत दणदणीत अर्धशतक पूर्ण केले. आयपीएलच्या इतिहासातील हे चौथ्या क्रमांकाचे सर्वात कमी चेंडूत केलेले अर्धशतक आहे.**



अर्धशतकानंतरही तुफानी फटके मारत असताना फ्रेझर मॅकगर्क बाद झाला. बाद होण्यापूर्वी त्याने १७ चेंडूत ७ षटकार आणि ५ चौकार लगावत ६८ धावांची वादळी खेळी केली आणि संघाला पॉवरप्लेमध्ये १०० धावांची संख्या पार करून दिली. त्याने आयपीएल २०२४ मधील सर्वात जलद अर्धशतक झळकावले, पण सोबतच तो दिल्लीसाठीही सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा पहिला फलंदाज ठरला. फ्रेझर मॅकगर्क बाद झाला. बाद होण्यापूर्वी त्याने १७ चेंडूत ७ षटकार आणि ५ चौकार लगावत ६८ धावांची वादळी खेळी केली आणि संघाला पॉवरप्लेमध्ये १०० धावांची संख्या पार करून दिली. त्याने आयपीएल २०२४ मधील सर्वात जलद अर्धशतक झळकावले, पण सोबतच तो दिल्लीसाठीही सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा पहिला फलंदाज ठरला.जेक फ्रेझर-मॅकगर्कने वॉशिंग्टन सुंदरच्या एकाच षटकात ३० धावा दिल्या. दिल्लीच्या डावातील तिसऱ्या षटकात त्याने पहिले दोन चेंडू लॉंग ऑफच्या दिशेने चौकार मारले. यानंतर तिसऱ्या चेंडूवर लॉंग ऑफला षटकार लगावला. चौथा चेंडूही जेक फ्रेझर-मॅकगर्कने चौकारासाठी धाडला. या २२ वर्षीय फलंदाजाने षटकाच्या शेवटच्या दोन चेंडूंवर षटकार ठोकला. तर शेवटच्या दोन्ही चेंडूवर त्याने दणदणीत षटकार लगावले. यासह त्याने ३० धावा ६ चेंडूतच केल्या. ४,४,६,४,६,६ अशी फटकेबाजी त्याने वॉशिंग्टन सुंदरच्या षटकात केली.दिल्लीच्या गोलंदाजीवर हैदराबादच्या फलंदाजांनी एका षटकात २२, २३ धावा केल्या, पण फ्रेझर मॅकगर्कने एका षटकात ३० धावा करत हेड-अभिषेक शर्मापेक्षाही वरचढ खेळी केली. ट्रॅव्हिस हेडने याच सामन्यात १६ चेंडूत अर्धशतक झळकावले होते. मात्र मॅकगर्कने अवघ्या १५ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. पॉवरप्लेमध्ये त्याला केवळ १३ चेंडू खेळण्याची संधी मिळाली. यावर ४६ धावा केल्यानंतर त्याने ७व्या षटकात मयंक मार्कंडेविरुद्ध अर्धशतक पूर्ण केले.

### मॅकगर्कने 68 धावांची वादळी खेळी

अर्धशतकानंतरही तुफानी फटके मारत असताना फ्रेझर मॅकगर्क बाद झाला. बाद होण्यापूर्वी त्याने १७ चेंडूत ७ षटकार आणि ५ चौकार लगावत ६८ धावांची वादळी खेळी केली आणि संघाला पॉवरप्लेमध्ये १०० धावांची संख्या पार करून दिली. त्याने आयपीएल २०२४ मधील सर्वात जलद अर्धशतक झळकावले, पण सोबतच तो दिल्लीसाठीही सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा पहिला फलंदाज ठरला. फ्रेझर मॅकगर्क बाद झाला.